

# उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह

**Recent Trends in Higher Education**

अथर्व

३८. उच्च शिक्षणातील आव्हाने व संधी
- डॉ. व्ही.एस. देसले ....................................................................११५
३९. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीची बदलती स्थित्यंतरे
- प्रा. सतीश मधुकर बोरसे ....................................................................११७
४०. उच्च शिक्षण आणि ग्रामीण समाज यांची वर्तमान प्रस्तुतता
- प्रा.डॉ. दिलीप तुकाराम कदम ....................................................................१२२
४१. जागतिकीकरण : उच्च शिक्षणातील नवे विचार प्रवाह
- प्रा.डॉ.विजय तुंटे, प्रा.हर्षवर्धन जाधव ....................................................................१२५
४२. उच्च शिक्षणातील आव्हाने आणि समस्या
- प्रा. सुभाष के. पवार, -- प्रा. भारत वि. कल्याणकर ....................................................................१२९
४३. पर्यावरण शिक्षणाची भूमिका
- प्रा.डी.आर. चव्हाण, प्रा.आर.बी.पाटील ....................................................................१३१
४४. उच्चशिक्षणातील स्त्रियांचे महत्त्व
सौ. शुभांगी दिगंबर चव्हाण ....................................................................१३४
४५. शाहु महाराजांनी केलेले स्त्री शिक्षणाचे कार्य व वर्तमान स्थिती
- श्रीमती मंजुषा माधवराव गरूड ....................................................................१३६
४६. आधुनिक महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाचा विकास व उपाययोजना
- प्रा.डॉ. बालाजी विठ्ठलराव पवार ....................................................................१३९
४७. उच्च शिक्षण आणि महिला सबलीकरण : एक अध्ययन
- प्रा.डॉ.डी.के. कदम ....................................................................१४२
४८. उच्च शिक्षणात पर्यावरण शिक्षणाची आवश्यकता
- प्रा.नंदा पंढरीनाथ कंधारे ....................................................................१४६
४९. समाज परिवर्तनात स्त्री शिक्षणाचे महत्व
-डॉ.पी.एम.शिंदे, -श्वेता पांडुरंगराव जोगदंड ....................................................................१५०
५०. जागतिकीकरण आणि उच्चशिक्षण : आव्हाने आणि उपाययोजना
- प्रा.डॉ. कविता धनंजय धर्माधिकारी ....................................................................१५२
५१. महिला सबलीकरणात उच्च शिक्षणाची भूमिका
- प्रा.डॉ.संजय जिभाऊ पाटील, -- प्रा.संजय बी. शिंगाणे ....................................................................१५५
५२. महाविद्यालयीन शिक्षणातील गळतीची कारणे
- प्रा.डॉ.सुधाकर एल. जाधव ....................................................................१५९
५३. उच्च शिक्षणात पर्यावरण शिक्षणाची भुमिका
- प्रा. विजय भोजू खैरनार ....................................................................१६१
५४. शिक्षणातील नवप्रवाह अर्थात उच्च शिक्षणात संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापनाचे स्थान
- डॉ. जे.एन. चव्हाण ....................................................................१६३
५५. उच्च शिक्षण-गुणवत्ता व कौशल्य
- प्रा. डॉ. अमोल दंडवते ....................................................................१६६

# उच्च शिक्षण आणि महिला सबलीकरण : एक अध्ययन

– प्रा.डॉ.डी.के.कश्यप
समाजशास्त्र विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर, जि.नांदेड

शतकानुशतके पुरूष प्रधान व्यवस्थेच्या विचारांच्या चौकटीत स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. देशातील अर्धी मानवी शक्ती ही स्त्री शक्ती आहे. पण या संस्कृतीने स्त्री शक्तीला बंदिस्त केल्यामुळे ही स्त्री शक्ती अडगळीतच पडली. त्यांचे परिणाम गंभीर स्वरुपात पुढे आले. त्यामुळे महिला सबलीकरण ही संकल्पना सद्यकालीन परिस्थितीत जगातील प्रत्येक राष्ट्राचा चर्चेचा महत्वाचा प्रश्न बनला आहे. म्हणून या संकल्पनेचे स्वरुप दिवसेंदिवस व्यापक बनत आहे. जगातील बहुतांश राष्ट्रामध्ये पितृसत्ताक कुटुंब व्यवस्था असल्याने सर्वच क्षेत्रात पुरूषांचे वर्चस्व निर्माण झाले. त्यामुळे सामाजिक, आर्थिक, राजकिय व शैक्षणिक क्षेत्रापासून स्त्रिया वंचित राहिल्या. म्हणून स्त्रियांचा विकास होवू शकला नाही. समाजात लिंगभेद आधारीत सामाजिकरण, मुलामुलींच्या बालसंगोपनामध्ये पक्षपात, मुलामुलींचे वेगवेगळे खेळ व लिंगावर आधारीत श्रमविभाग जाणिवपूर्वक केले जाते. त्यामुळे जगातील बहुतांश समाजात लिंगभेदावर आधारीत विषमता असलेली दिसते. फायरस्टोन या स्त्रीवादी विचारवंनाने म्हटले आहे मानवी समाजाचा इतिहास संघर्षाचा इतिहास नसून तो लैंगिक संघर्षाचा इतिहास आहे. म्हणून लिंगभेद विरहीत व स्त्री पुरूषांना समान दर्जा देण्यासाठी व सामाजिक विषमता दुर करून स्त्रियांचे सक्षम सबलीकरण अत्यंत महत्वाचे ठरते.

महिला सबलीकरणाची संकल्पना सर्वप्रथम इ.स.१९६० मध्ये अमेरिकेतील काळया जहालवादी गटांनी मांडली. या स्त्रियांनी म्हटले की, आम्ही स्त्रीय नाहीत का ? आम्हाला अधिकार का नाहीत ? या विचारांनी महिला सबळीकरणाची सुरूवात झाली. समान दर्जा आणि स्वातंत्र्य या स्त्रीवादाच्या मूळ कल्पना आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीचे उदगाते रुसो लॉक बेथम यांच्या विचारसरणीतून या कल्पना उगम पावल्या आहेत.

महिला सबलीकरणाची सुरूवात खज्या अर्थाने इ.स. १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष घोषीत केले. इ.स.१९७५ ते १९८५ हे महिला दशक जाहीर केले. सन १९८५ मध्ये नौरोबी येथील महिला आंतरराष्ट्रीय संमेलन झाले तेंव्हा महिला सबलीकरणाची सुरुवात झाली. तेंव्हापासून ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून पाळण्यास सुरुवात झाली.

ब्रिटीशांच्या स्त्रीविषयक उदारमतवादी धोरणाने प्रभावीत होवून काही भारतीय उच्च शिक्षित तरुणांनी महिला सबलीकरणाला चालना देण्याचा प्रयत्न केला. ज्यामध्ये राजाराम मोहनरॉय, न्या.रानडे, महर्षी कर्वे, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, निवेदिता, सरोजिनी नायडू, डॉ.ॲनी बेंझट, पंडीता रमाबाई व रमाबाई रानडे यांचे योगदान अतिश महत्वाचे ठरते. अखिल भारतीय महिला परिषद यासारख्या संघटनांचे कार्य देखील सबलीकरणासाठी अत्यंत महत्वाचे आहे.

स्वातंत्र्य कलाखंडात भारत सरकारने महिलांचे सबलीकरण घडवून आणण्यासाठी राज्य घटनेत स्त्रीयांना पुरूषाबरोबर समान अधिकार हक्क बहाल केले त्यात हिंदू विवाह कायदा (१९५५), हिंदू वारसा हक्क कायदा (१९५६), दत्तक कायदा, हुंडा बंदी कायदा (१९६१), कौटुंबिक हिंसा प्रतिबंधक कायदा (२००५), शिक्षण विषयक मुलभूत हक्क कायदा (२०१०) या कायद्यांची निर्मिती करून महिला सक्षमीकरणाला चालना दिली आहे. परंतु शिक्षणामुळे व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा, बौद्धीक शक्तीचा विकास होतो. आर्थिक, राजकिय, सांस्कृतिक कार्य पार पाडण्याची क्षमता त्यांच्या अंगी येते. जागतिक पातळीवर संयुक्त राष्ट्र संघटनेनी महिलांच्या शिक्षणावर भर दिला. उच्च शिक्षण हे महिलांना आपल्या अधिकाराबाबत जागरुक करते. शिक्षणाच्या माध्यमातून विविध स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतात. महिला सबलीकरणासाठी उच्च शिक्षणाची आवश्यकता आहे.

**अध्ययनाचा उद्देश :**

१) महिला सबलीकरणाची संकल्पना अभ्यासणे. २) महिला सबलीकरणाचे विविध पैलू अध्ययन करणे. ३) उच्च शिक्षणाचा आढावा घेणे. ४) महिला सबलीकरणासाठी उच्च शिक्षणाची आवश्यकता स्पष्ट करणे. ५) महिला सबलीकरणाला उच्च शिक्षणातील अडथळे जाणून घेणे.

**संशोधन पद्धती :** प्रस्तुत शोध निबंधाच्या अध्ययनासाठी तथ्य संकलन मिळवतांना व्दितीय संकलन पद्धतीचा अवलंब केला आहे. ज्यामध्ये संशोधन विषयाशी संबंधित पुस्तके, ग्रंथ व निमशासकीय, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, मासिके, शोध प्रबंध, कार्यशाळा, सेमिनार, चर्चासत्र तसेच इंटरनेटवरील माहिती आधार घेण्यात आला आहे. संकलित तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी निदानात्मक संशोधन आराखड्यांचा अवलंब करण्यात आला आहे.

**तथ्यांचे विश्लेषण :** पुरूषप्रधान सामाजिक संरचनेत परिवर्तन करण्याच्या उद्देशाने महिला सबलीकरणाचा उदय झाला. गितासेन आणि करेन ग्राऊन यांनी आपल्या विकास संकट आणि वैकल्पिक परिप्रेक्ष्या ग्रंथात १९८७ मध्ये सर्वप्रथम हा शब्द वापरला.

**गिता सेन :** जोपर्यंत पितृसत्ताक पद्धती पासून स्त्रियांची मुक्तता होणार नाही आणि जागतिक विषमतेला आव्हान देण्यासाठी स्त्रियांना सक्षम बनविले जात नाही तोपर्यंत महिलांचा विकास शक्य नाही.

**मोझर यांच्या मते :-** दुसऱ्यावर स्वामीत्व स्थापीत करण्यापेक्षा संघटीत होऊन अंगभूत क्षमतांना आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने विकास करून निर्णायक प्रश्नाबाबत निर्णय घेणे व संसाधनावर नियंत्रण प्रस्थापित करणे आणि अडवणुकीला आवाहन देणे म्हणजेच सबलीकरण होय . समाजशास्त्रीय विश्लेषनानुसार महिला सबलीकरण किंवा सक्षमीकरण अशी प्रक्रिया आहे की ज्याद्वारे स्त्री-पुरूष संबंधाची पुनर्रचना करणे आणि समाजात स्त्रीयांना पुरूष समान दर्जा व भूमिका प्रदान करून स्त्रीयांचा सर्वांगीण विकास केला जातो.

**महिला सबलीकरण आणि उच्च शिक्षण :** मानवी स्थिती सुधारण्यासाठी शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. उच्च शिक्षणामुळे स्त्रीया सामाजिक प्रथा व परंपराकडे वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहू लागल्या, शिक्षणामुळे आज प्रत्येक नौकरी करीता आहेत. उच्च शिक्षणामुळे स्त्रियांचे सबलीकरण होऊन परदेशात महिलाचा प्रवास सुरू झाला आहे. परंतू या अमेरिकेतील संस्थेने जगातील ९९ देशातील महिलाच्या स्थितीचा अभ्यास केला. त्या अहवालानुसार जगातील ७८% स्त्रियांचा दर्जा हा वाईट होता तर त्या ९९ राष्ट्रामध्ये भारतीय महिलांचे स्थान ७७ वे होते. म्हणून आज महिलांच्या स्थिती सुधारणा करण्यासाठी महिलाच्या सबलीकरणासाठी उच्च शिक्षणाची आवश्यकता आहे.

**भारतातील उच्च शिक्षणाचा संक्षिप्त इतिहास :** भारतात ब्रिटीश राजवटीत भारतात उच्च शिक्षणासाठी १८५८ मध्ये ३ विद्यापीठ, २७ महाविद्यालय, त्यात ५३९७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. ब्रिटीशांच्या काळात उच्च शिक्षणाचा जास्त प्रमाणात विकास झाला नाही. कारण इ.स. १९४७ पर्यंत भारतात उच्च शिक्षणासाठी १९ विद्यापीठ, ४९६ महाविद्यालये तर २४१३६९ विद्यार्थी उच्च शिक्षण घेत होते. ब्रिटीश काळातील उच्च शिक्षणाचा विचार केला तर भारतात जवळपास १०० वर्षात १६ विद्यापीठ संख्या वाढली तर ४८९ महाविद्यालयाची संख्या वाढ झाली. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी संख्या २३५९७० वाढ झाली. ब्रिटीशाच्या उदारमतवादी धोरणामुळे उच्च शिक्षणाची प्रगती अशा प्रकारे झाल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात जो उच्च शिक्षणाचा विस्तार झाला तो पुढील प्रमाणे.

भारतात इ.स.२०१०-११ मध्ये उच्च शिक्षणासाठी ५६४ विद्यापीठे, शिक्षकांची संख्या ८,१६,९६६ असून महाविद्यालयांची संख्या ३३०२३ एवढी आहे. उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांची संख्या १,६९,७५,००० झाली आहे. जगातील उच्च शिक्षणाची स्थिती आणि भारतातील उच्च शिक्षणाची स्थिती यात फार तफावत असल्याचे दिसून येते. कॅनडा उच्च शिक्षणात प्रथम क्रमांकावर आहे. वेगवेगळया देशात उच्च शिक्षणाचे प्रमाण पुढील प्रमाणे आहे. कॅनडा - ८८%, संयुक्त अमेरिका - ८०%, जपान - ५८%, तर भारतात उच्च शिक्षणाचे प्रमाण १०.८४% आहे. यावरुन हे स्पष्ट होते की इतर देशांच्या तुलनेत आजही भारतात उच्च शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे.

भारतात स्त्रियांना उच्च शिक्षणात मद्रास विद्यापीठ इ.स. १८७६ साली दोन महिला विद्यार्थीनीनी प्रवेश दिला. त्यानंतर इ.स.१८७६ साली कलकत्ता विद्यापीठाने महिलांसाठी प्रवेश दिला असल्याचे दिसून येते. लंडन विद्यापीठाने १८९७ साली महिलांना उच्च शिक्षणात प्रवेश दिला. पाश्चात्य विद्यापीठापेक्षा भारतीय विद्यापीठात महिलांना उच्च शिक्षणात प्रवेश अगोदर दिला होता हे उच्च शिक्षणातील महिलांचा प्रवेश हे अत्यंत महत्वाचे पाऊल होय.

**भारतातील उच्च शिक्षणाची शाखा निहाय स्थिती २०१०-११**

कला ....................................६१,७७,७३०

विज्ञान ................................३१,२७,०४२

वाणिज्य / व्यवस्थापन ..................२९,०४,७५२

अभियांत्रिकी / तंत्रज्ञान ............ ५,२८,६२,४३९
..........................................६,५२,५३३
वैद्यकिय ........................................ २७,४३०
पशु वैद्यकिय ........................................ १३,१६६
कृषी............................................५,६९,९६१
(३) शिक्षण ........................................३,२७,१४६
कायदा............................................२,३२,६९१
इतर / अन्य............................................

Source UGC 2012 Higher Education at Glance

भारतातील उच्च शिक्षणाची स्थिती वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते. कला शाखेतील उच्च शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाण जास्त आहे. त्याखालोखाल विज्ञान शाखेतील शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण आहे. तर अभियांत्रिकी/तंत्रज्ञान, वैद्यकियशास्त्र यात उच्च शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. कृषी पदवी घेणाऱ्या शिक्षणाचे प्रमाण अतिअल्प आहे.

**भारतातील पुरूष – महिला साक्षरता दर**

| जनगणना वर्ष | साक्षरता प्रमाण | | पुरूष–महिला साक्षरतेची तफावत |
|---|---|---|---|
| | पुरूष | महिला | |
| १९५१ | २७.२ | ८.९ | १८.३ |
| १९६१ | ४०.४ | १५.० | २५.० |
| १९७१ | ४६.० | २२.० | २४.० |
| १९८१ | ५६.४ | २९.८ | २६.६ |
| १९९१ | ६४.१ | ३९.३ | २४.८ |
| २००१ | ७५.५ | ५३.७ | २१.६ |
| २०११ | ८२.१ | ६५.५ | १६.७ |

भारतातील साक्षरतेची प्रगती उल्लेखनीय झाली आहे. भारतात १९५१ मध्ये साक्षरतेचे प्रमाण हे १८.३ टक्के होते तर २०११ मध्ये साक्षरतेचे प्रमाण ७४ टक्के झाले आहे. शिक्षण क्षेत्रातील अतिशय चांगली प्रगती असल्याचे दिसून येते. सन २०११ च्या जनगणनेनुसार एक हजार पुरूषामागे महिलांचे साक्षरतेचे प्रमाण ९४० आहे. स्त्री–पुरूषातील लिंग गुणोत्तर प्रमाणात तफावत निर्माण होत आहे. त्याकरीता स्त्रियांमध्ये शिक्षणाची जाणीव जागृती निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. भारतातील उच्च शिक्षणातील प्रमाण अतिशय वाईट स्थितीत आहे. आज भारतात ग्रामीण भागात उच्च शिक्षणाचे प्रमाण ६.७४% आहे. शहरी भागात उच्च शिक्षणाचे प्रमाण १९.८८% आहे उच्च शिक्षणात पुरूषाचे प्रमाण १२.१२.४२ टक्के आहे. उच्च शिक्षणात स्त्रियांचे प्रमाण ९.११ टक्के आहे. उच्च शिक्षणातही स्त्री पुरूषाच्या प्रमाणात तफावत आहे. महिलांचे सबलीकरण होण्यासाठी उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढवणे गरजेचे आहे.

**भारतातील विद्यापीठाया प्रशासनात महिलांची स्थिती**

| अ.क्र. | प्रशासकीय पदे | संख्या |
|---|---|---|
| ०१ | कुलपती | ०३ |
| ०२ | कुलगुरु | १२ |
| ०३ | प्रभारी कुलगुरु | ०३ |
| ०४ | कुलसचिव | ०७ |
| ०५ | अधिष्ठता | ७२ |
| ०६ | संचालक | ११ |

अखिल भारतीय विद्यापीठ हस्त पुस्तिका २००० नवी दिल्ली पृष्ठ क्र. २

उच्च शिक्षणामुळे गोदावरी परुळेकर, मेधा पाटकर, इंदिरा गांधी, किरण बेदी, खोब्रागडे, प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग उच्च शिक्षणाचा परिणाम आहे. उच्च शिक्षणातील काही अडथळे आहेत. त्यातील अडथळा म्हणजे १९९८ संयुक्त राष्ट्रसंघाच्या कॉमर्स अहवालानुसार शाळेत भौतिक सुविधांचा अभाव हा स्त्रि शिक्षणातील अडथळा आहे. स्त्री शिक्षकांचा अभाव हा महत्त्वाचा अडथळा आहे. उच्च शिक्षणात महिलांचे प्रमाण वाढविण्यासाठी उच्च शिक्षणावरील एकुण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६% उत्पन्न शिक्षणावर खर्च करण्यात यावा. परंतु भारत उच्च शिक्षणावरील खर्च फारच कमी होतांना दिसून येतो. भारतात २००१ मध्ये उच्च शिक्षणावर खर्च एकुण राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त ०.४ टक्के होता. २००६-१० मध्ये भारतातील एकुण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १.१५ टक्के झाला आहे. उच्च शिक्षणावरील खर्चात वाढ करणे गरजेचे आहे. कारण केनिया, फ्रान्स, थायलंड या देशात एकुण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के खर्च उच्च शिक्षणावर केला जातो.

**उपाय :**

१) भारतामध्ये अजूनही लिंगभेद अस्तित्वात आहे. स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी कार्य करणे आवश्यक आहे.

२) उच्च शिक्षणावर खर्च वाढवणे. एकुण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के खर्च उच्च शिक्षणावर करावा.

३) भारतामध्ये आज एकुण विद्यापीठाची संख्या ६३४ आहे. अजूनही भारतात महिला विद्यापीठाची संख्या वाढवणे आवश्यक आहे.

**समारोप** : महिला सबलीकरणाची संकल्पना ही व्यापक स्वरुपाची आहे. आजही भारतीय समाजात महिला सबलीकरणासाठी उच्च शिक्षणाची आवश्यकता आहे. महिलांच्या उच्च शिक्षणात आजही अडथळे आहेत. महिलांच्या सबलीकरणासाठी उच्च शिक्षणात विविध उपक्रमांचा समावेश करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


- डॉ.सौ.नंदिनी तडकलकर चौधरी महिलांचे सबलीकरण आणि शेतकरी महिला आघाडीचे योगदान, अल्फा पब्लीकेशन, नांदेड २००८.
- डॉ.स्मिता मेहेत्रे भारतीय स्त्री आणि मानवाधिकार, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर - २०११.
- योजना मासिक जुलै - २०११.
- प्रा.कांबळे सी.टी., प्रा.पवळे टी.एस. भारतीय सामाजिक चळवळीची रुपरेषा, क्रिएटिव्ह पब्लीकेशन, नांदेड - २०१०.
- भारत सरकार जनगणना २००० ते २०११
- गोटे शुभांगी महिला सक्षमीकरण स्वरुव व समस्या, वरद प्रकाश औरंगाबाद - २००४
- अखिल भारतीय विद्यापीठ हस्त पुस्तिका २००० नवी दिल्ली.


●●●●